# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 08/09/2021 (बुधवार)

(दुपार)

---

### अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. कोंढाळी:— अंतर्गत 4 कि. मी. अंतरावरील चमेली शिवार येथे दिनांक 09/08/2021 चे 19:30 वा. दरम्यान आरोपी नामे— जानराव बाजीराव उईके (मृतक), वय 60 वर्ष, रा. दुधाळा ता. काटोल जि. नागपुर हे आपली एमएच—40/बीएन— 7038 क्रमांकाच्या मोटरसायकलने दुधाळा वरून चमेली येथे जात होते. त्यादरम्यान चमेली गावाच्या पुलाजवळ रोडवर गाय आडवी आल्याने ते मोटरसायकलवरून खाली पडले. या अपघातात त्यांच्या डोक्याला व छातीला मार लागल्याने ते गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकामी मेडिकल कॉलेज नागपुर येथे नेले असता दि 10/08/2021 रोजी सकाळी 7.30 वा. त्यांचा मृत्यु झाला. त्यांचे कागदपत्र पो स्टे. कोंढाळी ला दि 24/8/21 रोजी प्राप्त झाल्याने दि 25/8/21 रोजी मर्ग क्र 33/21 कलम 174 जाफौ अन्वये दाखल करून सदर मर्ग चे ठाणेदार योनी कागदपत्र तपासले असता सदर घटना ही अपघात असुन मोटरसायकलचा चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन स्वताच्या मरणास कारणीभुत झाल्याने तपासात निष्पन्न होत असल्याने सदर मर्गच्या चौकशी अहवालावरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोशी उमेश पातुर्डे यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री देंवेद्र सोनवले मो क्र. 9673526177 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कन्हान:— अंतर्गत 5 कि. मी. अंतरावरील डुमरी अण्णामोड जवळ येथे दिनांक 05/09/2021 चे 11:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे— जनक सोमाजी नेवारे वय 35 वर्ष रा. हुडकिटोला बुधबुधा बालाघाट, मध्यप्रदेश व त्याचा गावातील राहणारा मित्र नामे— सुनिल यशवंत पटले, वय 25 वर्ष, रा. बुधबुधा बालाघाट, मध्यप्रदेश हे दोघेही डबलसिट हिरो डिल्कस गाडी क्र एमपी— 50/एम.आर—5231 नी कन्हान मार्गे नागपुर जात होते. त्यादरम्यान एमएच—24/एएफ—2266 क्रमांकाचा कारचा चालक आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटरसायकला समोरून धडक दिली. या अपघातात फिर्यादीच्या पायाला फ्रॅक्चर झाले आहे. तसेच मानेला टाके लागले असून उपचार सुरू आहे. तसेच फिर्यादीच्या गाडी वर डबलसिट बसलेला सुनिल पटले याला सुध्दा अपघातस्थळी जबर दुखापत झाल्याने तो मेडीकल कॉलेज येथे उपचार दरम्यान मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा नरेश वरखेडे मो 9637005303 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर